नव्याने स्थापन करण्यात आलेले फिरते परिवहन पथक, पालघर येथील ४ नियमित अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत .

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अपदे २०१९/प्र.क्र.२१६ /आरोग्य-३ अ

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी.रुग्णालय आवार, मुंबई ४०० ००१
तारीख: ११ जुलै,२०१९

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः सार्वजनिक आरोग्य विभाग पदनि-२०१८/प्र.क्र.४० (भाग-२) /आरोग्य-३ दि.२३.०५.२०१८
२) उपसंचालक,आरोग्य सेवा (परिवहन),पुणे ०१ यांचे पत्र क्र. आसेप/कक्ष-११६/असाई/पदे/मंजुरी/पालघर/५७७५-७८/२०१९ दि.२१.०६.२०१९
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक ५.०३.२०१८
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक ७.०९.२०१८
५) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक २१.०२.२०१९

प्रस्तावना-

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णया अन्वये उपसंचालक,आरोग्य सेवा (परिवहन), पुणे यांच्या अधिपत्याखाली नव्याने स्थापित करण्यात आलेले फिरते परिवहन पथक, पालघर करीता ४ नियमित अस्थायी पदे निर्माण करण्यात आली आहेत. यांनी संदर्भ क्र.२ अन्वये उपसंचालक,आरोग्य सेवा (परिवहन), पुणे ४ अस्थायी पदांना दि.२३.०५.२०१८ ते २८.०२.२०२० या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यासंबंधी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

शासन निर्णय-

आता या शासन निर्णया अन्वये सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार उपसंचालक,आरोग्य सेवा (परिवहन), पुणे यांच्या अधिपत्याखाली नव्याने स्थापित करण्यात आलेले फिरते परिवहन पथक, पालघर या कार्यालयाकरीता ४ अस्थायी पदांना दि.२३.०५.२०१८ ते ३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर अस्थायी पदांपैकी एकही पद ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त नसल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. सदर पदांपैकी कोणतेही पद ६ महिन्यांपेक्षा जास्त

कालावधीसाठी रिक्त असल्याचे आढळून आल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांची राहील या अटीच्या अधीन राहून तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन शासननिर्णयात नमूद केलेल्या मंजूर पदांचा आकृतीबंध मंजूर करुन घेण्याच्या अटींच्या अधीन राहून मुदवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खाली दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात यावा आणि हा खर्च सन २०१९-२०२० या वर्षाकरिता मंजूर झालेल्या अनुदानातून भागवण्यात यावा.

मागणी क्रमांक आर-०१
२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६- सार्वजनिक आरोग्य,
८००- इतर खर्च,
(०१)(०१)- आरोग्य सेवा परिवहन अंतर्गत वेतनावरील खर्च(२२१० १०५३)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक ५ मार्च,२०१८, वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक ७ सप्टेंबर,२०१८, व शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक २१ फेब्रुवारी,२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१०१५४५३८०११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed4c738df60ac2ac776b9e2481f77ad50aba9dc28bb31a482e03c7ee7b6f64d8, serialNumber=7caa550613a8c4cb7c593368faa24e20d6f8985f510118e6fc1af8b04a443ee8, cn=Rajendra Shamraoji Kaurte
Date: 2019.07.11 18:08:22 +05'30'

(रा. शा. कौरते)
(अवर सचिव, महाराष्ट्र शासन)

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व लेखापरिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
२. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३. सहसंचालक, आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन), मुंबई

४. जिल्हा शल्यचिकित्सक, पालघर
५. अधिदान व लेखा अधिकारी,पालघर
६. वित्त विभाग (व्यय १३)/वित्तीय सुधारणा-१,/आ.पु.क. मंत्रालय, मुंबई
७. अवर सचिव (सेवा-२, सेवा-३, सेवा-५, अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८. निवडनस्ती (आरोग्य-३ अ)

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-अपदे -२०१९ /प्र.क्र. २१६ / आरोग्य-३अ,

विवरणपत्र

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	ग्रेड पे	पदसंख्या
अ	**नियमित पदे**			
१	सेवा अभियंता	९३००-३४८००	४४००	१
२	कार्यदेशक	९३००-३४८००	४२००	१
३	कुशल कारागीर	५२००-२०२००	२४००	१
४	वीजतंत्री	४४४०-७४४०	१३००	१
	एकूण			४